४

११४८८१

तात्काळ/महत्वाचे

कालमर्यादा

जा.क.शिउसं/प्राथ-२/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/२०१४

शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,

पुणे-१ यांचे कार्यालय

दिनांक:- 17 MAY 2014

प्रति

अध्यक्ष/सचिव,

ब्रदर्स ऑफसंत गॅब्रिअल एज्युकेशनल सोसायटी वारणगल आंध्रप्रदेश

विषय - सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणे,तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेसाठी परवानगी देण्याबाबत..

संदर्भ :- १. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. २४) दिनांक २ जुलै २०१३.

२. शासन निर्णय एसएफएस-१११४/प्र.क्र.४०/एसएम-२ मंत्रालय, मुंबई ३२ दिनांक २६ फेब्रुवारी २०१४

वरील विषयी आपणांस कळविण्यात येते की,आपल्या संस्थेने वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता प्रस्ताव सादर केला होता.त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्रमांक-०२ च्या शासन निर्णयानुसार नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता खालील अटी व शर्तींवर परवानगी दिलेली आहे.

| शासन यादी अ.क्र. | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नाव | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पत्ता. | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/दर्जावाढ | मान्यता वर्ग/इयत्ता | मान्यतावर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| २९९ | अहमदनगर | ब्रदर्स ऑफसंत गॅब्रिअल एज्युकेशनल सोसायटी वारणगल आंध्रप्रदेश | मॉन्टफोर्ट स्कूल सावळी विहिर बु.ता.राहाता | इंग्रजी | नवीन शाळा | प्राथमिक | २०१४-१५ |

अटी व शर्ती :-

१. संस्थेने शाळा परवानगीसाठी विहित केलेले माध्यम व शाळेचे ठिकाण इत्यादींमध्ये भविष्यात कोणतेही बदल करता येणार नाही.

२. शासनाने ज्या ठिकाणी परवानगी दिलेली आहे,त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

३. या अधिनियमातील तरतुदींनुसार शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासून असेल.

४. शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये ज्या वर्गास परवानगी दिलेली आहे त्या वर्गा व्यतिरिक्त इतर वर्ग चालू करता येणार नाहीत.

५. परवानगी मिळालेपासून १८ (अठरा) महिन्यांच्या आत व्यवस्थापनाने शाळा सुरु न केल्यास सदर परवानगी आपोआप रद्दबातल ठरेल.

६. परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा यांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशाचे,कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन )मुख्य अधिनियम २०१३ मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

७. शाळा इमारतीच्या दर्शनीभागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वयं अर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी पात्र नवीन शाळा/वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील.

८. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळेचे भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.

९. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी प्राप्त शाळांना बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ मधील तरतुदींची पुर्तता करुन व्यवस्थापनाने शाळा मान्यतेकरिता माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ०३ परिशिष्ठ ०२ मधील विहित नमुन्यात एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेचा प्रस्ताव सक्षम अधिका-यांकडे सादर करणे आवश्यक राहील.

१० सीबीएसई,आयसीएसई,आयबी,आयजीएसई,आणि सीआयई इत्यादी शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्यासाठी इच्छुक व्यवस्थापनास /शैक्षणिक संस्थेस शासनाने पात्र ठरवून परवानगी (Permission) दिलेल्या संस्थांनी शासन निर्णय दिनांक २० जून २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वंकष धोरणानुसार ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C ) मिळविण्यासाठी प्रथमतः शाळेस मान्यता घेणे आवश्यक राहील.शाळांना अशी मान्यता (Recognition) सदर शासन निर्णयातील परिच्छेद (१०) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक ) जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबंधित मंडळाच्या संलग्नता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C ) मिळविणेसाठी शासनास अर्ज करेल.

११ महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना U-DISE मध्ये माहिती भरतांना स्वयंअर्थसहाय्यित शाळा / वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यकराहील.

१२ शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहित करेल अशा नियमांची अंमलबजावणी करणे संस्थेला बंधनकारक राहील.

(आ... दरेकर)
उपशिक्षणा...

गट शिक्षणाधिकारी
पंचायत समिती, राहाता

PRINCIPAL
Montfort School (CBSE)
Sawli Vihir (BK), Tal-Rahata
Dist. Ahmednagar, (M.S.)-423 109.

(सुमन शिंदे)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे-१

प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी,

१. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद,पुणे /अहमदनगर /सोलापूर.

प्रत माहितीसाठी सविनय सादर

१. मा.रा.ग.गुंजाळ,अवर सचिव,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-३२

२. मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे.

४

प्रथम मान्यता

अहमदनगर जिल्हा परिषद
शिक्षण विभाग (प्राथ.)
जा.क्र. कार्या-४/ स्वयंअर्थ/११०२/१४
अहमदनगर दि. /१२/२०१४
६.१.२०१५

प्रति,
अध्यक्ष/ सचिव
ब्रदर्स ऑफ सेंट गॅब्रिअल एज्युकेशन सोसायटी
वारंगल, आंध्रप्रदेश

**विषय :-** सन २०१४-१५या शैक्षणिक वर्षापासुन महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापन व विनियम ) अधिनियम २०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणे तसेच विदयमान शाळेचा दर्जावाढ करणे करीता परवानगी देऊन प्रथम मान्यता देणेबाबत

**संदर्भ :-** १) महाराष्ट्र शासनाने शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचा शासन निर्णय क्र. शासन निर्णय क्रमांक ११९४/pn-४०/sm- २/२०१४/दिनांक २६/०२/२०१४
२)मा. शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे-१ यांचेकडील पत्र क्र- प्र२/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/२०१४/११४८९/९० दिनांक-१७/०५/२०१४
३) मा. शिक्षण संचालक प्राथमिक महाराष्ट्र राज्य पुणे विभाग पुणे-१ यांचेकडील पत्रक्रखाप्राशा/स्वयंअर्थ/२०१३/ड-५१३/६३६६ दि- ३० नोव्हें २०१३

वरील विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा स्थापना व विनिमय अधिनियम २०१२ अंतर्गत शैक्षणिक वर्षे २०१४-१५ मध्ये नवीन शाळा स्थापन करणे करीता /विदयमान शाळेचा दर्जावाढ करणेकरीता प्रस्ताव सादर केला होता त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्र- १ च्या शासन निर्णयानुसार नवीन शाळा स्थापन करणेकरीता/विदयमान शाळेचा दर्जावाढ रकणेकरीता खालील अटी व शर्तीवर परवानगी दिलेली आहे-

संदर्भ क्र- २ अन्वये मा- शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे-१ यांचे नवीन शाळा स्थान करणे/विदयमान शाळेचा दर्जावाढ करणेकरीता परवानगी देण्यात आली आहे- संदर्भ क्र- ३ अन्वये मा- शिक्षण संचालक प्राथमिक म-रा-पुणे-१ यांनी प्रथम मान्यता देणेबाबतची कार्यवाही करणेबाबत सुचित केलेले आहे- संस्थेने खालील अटी शर्तीची पुर्तता करणेचे अटीवर प्रथम मान्यता देणेत येत आहे.

| शासन यादी अ क्र | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नाव | मान्यता मिळालेल्या शाळेचे नांव व पत्त | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/ दर्जावाढ | मान्यता वर्ग/ इयत्ता | मान्यता वर्षे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| २९९ | अहमदनगर | ब्रदर्स ऑफ सेंट गॅब्रिअल एज्युकेशन सोसायटी वारंगल, आंध्रप्रदेश | मॉन्टफोर्ट स्कूल, सावळीविहीर बु. ता. राहाता जि.अ.नगर | इंग्रजी | नवीन शाळा | १ ते ५ | २०१४-१५ |

**अटी व शर्ती :**

१ ) संस्थेने शाळा परवानगीसाठी विहित केलेले माध्यम व शाळेचे ठिकाण इत्यादीमध्ये भविष्यात बदल करता येणार नाही.
२) शासनाने ज्या ठिकाणी परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अनय ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.
३) या अधिनियमातील तरतुदीनुसार शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासुन असेल.
४ )शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये ज्या वर्गास परवानगी दिलेली आहे त्या वर्गाव्यतिरिक्त इतर वर्ग चालु करता येणार नाहीत
५ )परवानगी मिळालेपासुन १८ महिन्याच्या आत व्यवस्थापनाने शाळा सुरु न केल्यास सदर परवानगी आपोआप रद्द बातल ठरेल.
६ )परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा यांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमीत होणा-या आदेशाचे,कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा स्थापना व विनियमन मुख्य अधिनियम २०१३ मधील सर्व तरतुदीचे पालन करणे बंधनकारक राहील.
७ ) शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेचया माहितीकरीता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी पात्र नवीन शाळा/ वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील.
८)महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा स्थापना व विनमिय अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यतादिलेल्या शाळेचे भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.
९)महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा स्थापना व विनमिय अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गतपरवानगी दिलेल्या शाळांना मध्ये माहिती भरताना स्वयंअर्थसहाय्यित शाळा/ वर्ग म्हणुन स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.
१०)शासनाचे सध्या अस्थित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहित करेल अशा नियमाची अंमलबजावणी करणे संस्थेला बंधनकारक राहील.
११) पुर्व प्राथमिक शाळांना स्वतंत्र शाळा म्हणुन मंजुरी देण्यात आलेली नसुन त्या प्राथमिक शाळेला संलग्न म्हणुन मंजुर करण्यात आलेली आहे. त्यानुसार या अंतर्गत सुरु होणा-या शाळांना इयत्ता १ ली ५ पर्यत परवानगी देण्यात येत आहे.
१२) महाराष्ट्र आलकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ च्या पोटनियम (४) ११ मानके पुर्ण करणे आवश्यक आहे.
१३) शासन निर्णय दिनांक १३ डिसें २०१३ नुसार संच निश्चिती करुन घेणे आवश्यक आहे.
१४) प्रचलित नियम व निकषानुसार शिक्षक नियुक्ती करावी / टीईटी पात्र शिक्षकांची नियुक्तीसाठी योग्य ती कार्यवाही करावी.
१५) संस्था व्यवस्थापन व शिक्षणाधिकारी प्राथ जि.प. अहमदनगर संयुक्त नावे राष्ट्रीयकृत बँकेत तीन वर्षे कालावधीसाठी मुदतठेव ठेवणे आवश्यक आहे.

(आकाश दरेकर)
उपशिक्षणाधिकारी (माध्य.)
जिल्हा परिषद अहमदनगर

गट शिक्षणाधिकारी
पंचायत समिती, राहाता

शिक्षणाधिकारी प्राथमिक
जिल्हा परिषद अहमदनगर

प्रत- माहिती व कार्यवाहीसाठी
१ ) मा. शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे-१
२) मा. शिक्षण संचालक माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनाय महाराष्ट्र राज्य पुणे-१
३ ) मा. शिक्षण संचालक प्राथमिक शिक्षण संचालनाय महाराष्ट्र राज्य पुणे-१
४ ) गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती राहाता ता. राहाता

PRINCIPAL
Montfort School (CBSE)
Sawli Vihir (BK), Tal-Rahata
Dist. Ahmednagar, (M.S.)-423 109.

६

तात्काळ/महत्वाचे

कालमर्यादा

जा.क.शिउसं/प्राथ-२/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/२०१६

शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ यांचे कार्यालय

दिनांकः- ९७५८३

8 AUG 2016

प्रति

अध्यक्ष/सचिव,

ब्रदर्स ओफ संत गाब्रीअल एजुकेश्नल सोसायटी माउंटफोर्ट सदन, माचवेल रोड, सैनिकवाडी, पुणे-१४

विषय - सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणे,तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेसाठी परवानगी देण्याबाबत....

संदर्भ :-१. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. १,६ व २४) २०१२.

२. शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र नाहप्र-२००९/(६६३/०९)/माशि-१ दिनांक २०. जुन २०१२.

३. शासन निर्णय एसएफएस-२०१६/प्र.क्र.६९/एसएम-२ शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालय मुंबई-३ दि. १७.०६.२०१६.

वरील विषयी आपणांस कळविण्यात येते की,आपल्या संस्थेने वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता प्रस्ताव सादर केला होता.त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्रमांक-०३ च्या शासन निर्णयानुसार नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता खालील अटी व शर्तीवर परवानगी दिलेली आहे.

| शासन यादी अ.क्र. | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नाव | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पत्ता. | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/दर्जावाढ व मंडळ संलग्नता | मान्यता वर्ग/इयत्ता | मान्यतावर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १३९६ | अहमदनगर | ब्रदर्स ओफ संत गाब्रीअल एजुकेश्नल सोसायटी माउंटफोर्ट सदन, माचवेल रोड, सैनिकवाडी, पुणे-१४ | मांउटफोर्ट स्कूल सावाली विहीर (बु) रुई रोड, ता-राहता, जि-अहमदनगर पिन- ४२३१०९ | इंग्रजी | दर्जावाढ (सी बी एस ई) | प्राथमिक ला जोडून उच्च प्राथमिक (इयत्ता ६ वी ते ८ वी ) | २०१६-१७ |

३

१. प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांनी बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची/ तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

२. पात्र ठरलेल्या संबधित शाळेच्या व्यवस्थापनाने अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे.

३. ज्या व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता आहे अशा व्यवस्थापनांनी शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासुन एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेसाठी संबधित जिल्हयांच्या शिक्षणाधिका-यांकडे अर्ज करावेत

४. ज्या व्यवस्थापनास सन २०१६-१७ करिता या शासन निर्णयाव्दारे पात्र ठरविण्यात आले आहे. अशा व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पुर्तता करण्यासाठी या शासना निर्णयाच्या दिनांकापासून अठरा महिन्याच्या आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रददबातल ठरेल

५. सीबीएसई,आयसीएसई,आयबी,आयजीएसई,आणि सीआयई इत्यादी शिक्षण मंडाळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्यासाठी इच्छुक व्यवस्थापनास /शैक्षणिक संस्थेस शासनाने पात्र ठरवून परवानगी (Permission) दिलेल्या संस्थांनी शासन निर्णय दिनांक २० जून २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वंकष धोरणानुसार ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C ) मिळविण्यासाठी प्रथमतः शाळेस मान्यता घेणे आवश्यक राहील. शाळांना अशी मान्यता (Recognition) सदर शासन निर्णयातील परिच्छेद (१०) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक ) जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबंधित मंडळाच्या संलग्नता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C ) मिळविणेसाठी शासनास अर्ज करेल. सदर अर्जाची छाननी करुन सदर संबंधित शाळा विहित निकष, अटी व शर्तीची पुर्तता करीत असल्यास शासन शाळेस मंडळ संलग्नतेसाठी ना-हरकत (N.O.C ) प्रमाणपत्र देईल.

६. परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा/ दर्जावाढ शाळांना शासनांच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशाचे,कार्यपध्दतीचे तसेच महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन )मुख्य अधिनियम २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

७. संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची कार्यवाही करावी.

८. संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही, शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रदद समजण्यात येईल.

९. यु-डायस डाटा- या शासन निर्णयाव्दारे परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा/ दर्जावाढ शाळाबाबत जिल्हानिहाय U-DISE (Unified District Infofmation System For Education) मध्ये माहिती भरताना, स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुबंई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/ दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशव्दारावर लावणे आवश्यक राहील.

(आकाश दरेकर)
उपशिक्षणाधिकारी (माध्य.)
जिल्हा परिषद अहमदनगर

PRINCIPAL
Montfort School (CBSE)
Sawli Vihir (BK), Tal-Rahata
Dist. Ahmednagar, (M.S.)-423 109.

गट शिक्षणाधिकारी
पंचायत समिती, राहाता

(दिनकर टेमकर)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे-१

प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी,

१. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, पुणे /अहमदनगर /सोलापूर

६.

<u>प्रथम-मान्यता</u>

अहमदनगर जिल्हा परिषद
शिक्षण विभाग (प्राथ.)
जा.क्र.कार्या-४/स्वयंअर्थ/९८०/१६
अहमदनगर दि. ८ /३/२०१६

प्रति,

अध्यक्ष/ सचिव
**ब्रदर्स ऑफ संत गाब्रीअल एजुकेशन सोसायटी**
**माउंटफोर्ट सदन, माचवेल रोड सैनिकवाडी पुणे-१४**

<u>विषय</u> :- सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षापासुनं महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापन व विनियम) अधिनियम २०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणे तसेच विदयमान शाळेचा दर्जावाढ करणे करीता परवानगी देऊन <u>प्रथम मान्यतादेणेबाबत</u>

<u>संदर्भ</u> :-१) महाराष्ट्र शासनाने शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचा शासन निर्णय क्र. Sfs-१०१६/प.क्र-६९/sm-२ दिनांक १७/६/२०१६
२) मा.शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे-१ यांचेकडील पत्र क्र- प्राथ-२/स्वयंअशाळा / मान्यता/पुवि/१७५८३ दिनांक- ८/८/२०१६
३) मा.शिक्षण संचालक प्राथमिक महाराष्ट्र राज्य पुणे विभाग पुणे-१ यांचेकडील पत्र क्र-खाप्राशा/स्वयंअर्थ/२०१३/ड-५१३/६३६६ दि- ३० नोव्हें २०१३

वरील विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा स्थापना व विनिमय अधिनियम २०१२ अंतर्गत शैक्षणिक वर्षे २०१६-१७ मध्ये नवीन शाळा स्थापन करणे करीता /विदयमान शाळेचा दर्जावाढ करणेकरीता प्रस्ताव सादर केला होता त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस <u>संदर्भ क्र-१</u> च्या शासन निर्णयानुसार नवीन शाळा स्थापन करणेकरीता/विदयमान शाळेचा दर्जावाढ रकणेकरीता खालील अटी व शर्तीवर परवानगी दिलेली आहे-

<u>संदर्भ क्र- २</u> अन्वये मा- शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे-१ यांचे नवीन शाळा स्थान करणे/विदयमान शाळेचा दर्जावाढ करणेकरीता परवानगी देण्यात आली आहे- <u>संदर्भ क्र- ३</u> अन्वये मा- शिक्षण संचालक प्राथमिक म-रा-पुणे-१ यांनी प्रथम मान्यता देणेबाबतची कार्यवाही करणेबाबत सुचित केलेले आहे- संस्थेने खालील अटी शर्तीची पुर्तता करणेचे अटीवर प्रथम मान्यता देणेत येत आहे.

| शासन यादी अ क्र | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नाव | मान्यता मिळालेल्या शाळेचे नांव व पत्त | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/ दर्जावाढ | मान्यता वर्ग/ इयत्ता | मान्यता वर्षे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १३९८ | अहमदनगर | ब्रदर्स ऑफ संत गाब्रीअल एजुकेशन सोसायटी माउंटफोर्ट सदन, माचवेल रोड सैनिकवाडी पुणे-१४ | मांउटफोर्ट स्कुल सावली विहीर (बु) रुई रोड ता.राहता जि. अहमदनगर | इंग्रजी | दर्जावाढ सीबीएसई | उच्च प्राथमिक ६ ते ८ | २०१६-१७ |

(आकाश दरेकर)
उपशिक्षणाधिकारी (माध्य.)
जिल्हा परिषद अहमदनगर

गट शिक्षणाधिकारी
पंचायत समिती, राहाता

PRINCIPAL
Montfort School (CBSE)
Sawli Vihir (BK), Tal-Rahata
Dist. Ahmednagar (M.S.)-423 109.

अटी व शती :

१) संस्थेने शाळा परवानगीसाठी विहित केलेले माध्यम व शाळेचे ठिकाण इत्यादीमध्ये भविष्यात बदल करता येणार नाही
२) शासनाने ज्या ठिकाणी परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.
३) या अधिनियमातील तरतुदीनुसार शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासुन असेल.
४) शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये ज्या वर्गास परवानगी दिलेली आहे त्या वर्गाव्यतिरिक्त इतर वर्ग चालु करता येणार नाहीत.
५) परवानगी मिळालेपासुन १८ महिन्याच्या आत व्यवस्थापनाने शाळा सुरु न केल्यास सदर परवानगी आपोआप रद्द बातल ठरेल.
६) परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा यांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमीत होणा-या आदेशाचे,कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा स्थापना व विनियमन मुख्य अधिनियम २०१३ मधील सर्व तरतुदीचे पालन करणे बंधनकारक राहील.
७) शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेचया माहितीकरीता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी पात्र नवीन शाळा/ वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील.
८) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा स्थापना व विनमिय अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळेचे भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.
९) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा स्थापना व विनमिय अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना मध्ये माहिती भरताना स्वयंअर्थसहाय्यित शाळा/ वर्ग म्हणुन स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.
१०) शासनाचे सध्या अस्थित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहित करेल अशा नियमाची अंमलबजावणी करणे संस्थेला बंधनकारक राहील.
११) पुर्व प्राथमिक शाळांना स्वतंत्र शाळा म्हणुन मंजुरी देण्यात आलेली नसुन त्या प्राथमिक शाळेला संलग्न म्हणुन मंजुर करण्यात आलेल्या आहेत त्यानुसार या अंतर्गत सुरु होणा-या शाळांना इयत्ता ६ ली ८ पर्यत परवानगी देण्यात येत आहे.
१२) महाराष्ट्र आलकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ च्या पोटनियम (४) ११ मानके पुर्ण करणे आवश्यक आहे.
१३) शासन निर्णय दिनांक १३ डिसें २०१३/२८/८/२०१५ नुसार संच निश्चिती करुन घेणे आवश्यक आहे.
१४) प्रचलित नियम व निकषानुसार शिक्षक नियुक्ती करावी / टीईटी पात्र शिक्षकांची नियुक्तीसाठी योग्य ती कार्यवाही करावी.
१५) संस्था व्यवस्थापन व शिक्षणाधिकारी प्राथ जि.प. अहमदनगर संयुक्त नावे राष्ट्रीयकृत बँकेत तीन वर्षे कालावधीसाठी मुदतठेव ठेवणे आवश्यक आहे.

शिक्षणाधिकारी प्राथमिक
जिल्हा परिषद अहमदनगर

प्रत- माहिती व कार्यवाहीसाठी
१)मा.शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे-१
२)मा.शिक्षण संचालक माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनाय महाराष्ट्र राज्य पुणे-१
३)मा.शिक्षण संचालक प्राथमिक शिक्षण संचालनाय महाराष्ट्र राज्य पुणे-१
४)गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती राहाता

PRINCIPAL
Montfort School (CBSE)
Sawli Vihir (BK), Tal-Rahata
Dist. Ahmednagar, (M.S.)-423 109.

गट शिक्षणाधिकारी
पंचायत समिती, राहाता

(आ... ...कर)
उपशिक्षणाधिकारी (माध्य.)
जिल्हा परिषद अहमदन...

203

जिल्हा परिषद अहमदनगर, शिक्षण विभाग (प्राथमिक)
दुरध्वनी क्रमांक - ०२४१-२३५३६९४
ई मेल आयडी - ednprimary@gmail.com
पत्ता- नविन प्रशासकीय इमारत, अहमदनगर पिन कोड - ४१४००१

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

नमुना-2

ग्राम :- सावळीविहीर बु. दुरध्वनी:- 02423-251256 फॅक्स :- मोबाईल :- 9422671437

युडायस क्रमांक - 2726104907 ई-मेल :- montfortschoolshirdi@rdiffmail.com

जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचे कार्यालय अहमदनगर,महाराष्ट्र.

जावक क्र.प्राथ. शिक्षण/कार्या 4/आर.टी.ई./स्व मा/ 586 /2022 दिनांक 29 /11/2022

व्यवस्थापक :- ब्रदर्स ऑफ सेंट गब्रीयल सोसायटी वारंगल हैदराबाद.

विषय :- बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम,2009 यांच्या कलम 18 च्या प्रयोजनार्थ,बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम,2011 याच्या नियम 11,पोट नियम (4) अन्वये शाळांना मान्यता प्रमाणपत्र देण्याबाबत.

महोदय/महोदया,

आपल्या दिनांक 13/10/2022 च्या अर्जाच्या संदर्भात आणि त्यांनतर यासंदर्भात शाळेशी केलेला पत्रव्यवहार / शाळेची केलेली तपासणी या आधारे मी, भास्कर पाटील, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद अहमदनगर दिनांक 01/04/2022 पासून दिनांक 31/03/2025 पर्यंत तीन वर्षाच्या कालावधीसाठी इयत्ता 1 ली ते 8 वी करिता मोंटफोर्ट स्कुल सावळी विहीर ता. राहाता जि. अहमदनगर या शाळेस तात्पुरती मान्यता देत आहे.

1) मान्यता कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इ.8 वी नंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल.

2) बालकांना मोफत सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम 2009 (जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम 2011 (जोडपत्र दोन) मधील तरतुदीचे शाळा पालन करीत.

3) शाळा नजिकच्या,दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना पहिल्या इ.त्यां इयत्तेतील विदयाथी संख्येच्या किमान 25 टक्के मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पुर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की,पुर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीत देखील या प्रमाणकाचे अनुपालन करण्यात येईल.

4) परिच्छेद 3 मध्ये निर्दिष्ट केलेल्या बालकांकरिता शाळेला अधिनियमाच्या कलम 12 (2) नुसार प्रतिपूर्ती मिळेल अशी प्रतिपूर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते देण्यात येईल.

5) संस्था/शाळा कोणत्याही कॅपिटेशन फी वसुल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकास किंवा त्यांच्या किंवा तिच्या माता-पित्यास किंवा पालकांस भाग पाडणार नाही.

6) कोणत्याही बालकांस वयाच्या पुराव्याच्या अभावी धर्म,जात किंवा वंश जन्म ठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव व शाळेमध्ये प्रवेश नाकारण्यात येणार नाही.

7) (एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकांस तो कोणत्याही इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखुन ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही.
(दोन) कोणत्याही बालकांस शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देणार नाही.
(तीन) कोणत्याही बालकांस प्राथमिक शिक्षणपूर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.
(चार) प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या प्रत्येक बालकास नियम 23 अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देण्यात येईल.
(पाच) विकलांग/विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांचा अधिनियमाच्या तरतुदी नुसार समावेश करण्यात येईल.
(सहा) अधिनियमाच्या कलम 23 (1) अन्वये निर्धारित केलेली किमान अर्हता धारण करणा-या शिक्षकांना अशी किमान अर्हता 5 वर्षाच्या कालावधीत संपादित करावी लागेल.
(सात) अधिनियमाच्या कलम 24 (1) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्याची/तिची कर्तव्य शिक्षक पार पाडतील.

8) शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमांच्या आधारे तयार केलेल्या पाठयक्रमाचे पालन करील.

9) शाळा अधिनियमाच्या कलम 19 मध्ये विहित केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधाच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.

10)शाळा अधिनियमाच्या कलम 19 मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील.मागील तपासणीच्या वेळेत उपलब्ध असलेल्या सुविधा खालील प्रमाणे होत्या

- शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ 17404.63 चौ.मी.
- एकुण बांधकाम क्षेत्र 2545.00 चौ.मी.
- खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ 7048.00 चौ.मी.
- वर्गखोल्यांची संख्या 10
- कार्यालय-नि-भांडार-नि-मुख्याध्यापकांची खोली 02

..2..

(आकाश दरेकर)
उपशिक्षणाधिकारी (माध्य.)
जिल्हा परिषद अहमदनगर

गट शिक्षणाधिकारी
पंचायत समिती, राहाता

PRINCIPAL
Montfort School (CBSE)
Sawli Vihir (BK), Tal-Rahata
Dist. Ahmednagar, (M.S.)-423 109.

- मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहे-जेथे वापरण्यासाठी व प्रसाधनगृहे स्वच्छ आणि आरोग्यदायी स्थितीत ठेवण्यासाठी पुरेसे पाणी असेल.- आहे
- पिण्याच्या पाण्याची सुविधा---- आहे
- दुपारचे जेवण शिजविण्यासाठी स्वयंपाकघर----- लागू नाही
- अध्यापन अध्ययन साहित्य/खेळ व क्रीडाविषयक सामग्री/ग्रंथालय यांची उपलब्धता------- आहे.
- वाचन साहित्य विनासायास उपलब्ध--------- आहे

11) मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकडया शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र चालविता येणार नाहीत.
12) शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रिडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.
13) शाळा,सोसायटी नोंदणी अधिनियम,1860(1860 चा 21) किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, 1950 अन्वये नोंदणी झालेल्या संस्थ्मार्फत चालविण्यात येत आहे.
14) शाळा कोणत्याही व्यक्तीच्या गटाच्या किंवा व्यक्तिसंघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायदयाकरिता किंवा कोणताही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत नाही.
15) शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडून लेखापरिक्षित व प्रमाणित करुन घ्यावेत आणि नियमांनुसार योग्य लेखा विविरणपत्रे तयार करावीत.प्रत्येक लेखा विविरणपत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिकारी कडे पाठवण्यात यावी.
16) तुमच्या शाळेला मिळालेला मान्यता संकेतांक-

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 0 | 0 | 1 | 8 | 3 | 4 | 0 | 1 | 3 |

**10-018-34-013** असा आहे,हा या कार्यालयाशी कोणताही पत्रव्यवहार करताना कृपया तो नमूद करावा,याची नोंद घ्यावी.
17) शिक्षण संचालक/जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पूर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रुटी दूर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकरण देईल अशा सूचनांचे पालन करावे.
18) संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही असल्यास दस्तावेज नूतनीकरण केल्याची तारीख संनिश्चित करावी.
19) जोडपत्र (तीन) नुसार इतर शर्ती यासोबत जोडल्या आहेत.
20) संस्थेच्या मा.धर्मदाय आयुक्त यांचे कडील नोंदणीबाबत अपुर्तता,पदाधिकारी चेंज रिपोर्ट (बदल अहवालनुतनीकरण,लेखापरिक्षण इत्यादी संदर्भातील प्रकरणे प्रलंबित असल्यास सदर अहवालाची पुर्तता करुन घ्यावी व मा.धर्मदाय आयुक्त यांचेव्दारे मिळालेली परिशिष्ट 1 ची अदयावत प्रत शालेय दप्तरी जतन करुन ठेवावी.
21) संस्थेत वाद असल्यास मा.धर्मदाय आयुक्त,अहमदनगर यांचेव्दारे अंतीम निश्चित केलेल्या परिशिष्ट 1 मधील पदाधिकारी किंवा मा.धर्मदाय आयुक्त यांचेव्दारे सदर संस्थेच्या शाळेवर नेमलेल्या प्रशासकास देण्यात येईल.
22) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या निर्णयांचे,परिपत्रकांचे,आदेशांचे व कार्यपध्दतीचे पालन करणे संस्था व शाळा दोहोंवर बंधनकारक राहील.
23) स्वंयअर्थसहाय्यीत तत्वावरील शाळेस महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियम अधिनियम 2012 (सन 2013 चा मधील सर्व तरतुदीचे पालन बंधनकारक राहील.
24) शासनाकडून **मोंटफोर्ट स्कुल** नावाने इंग्रजी माध्यमासाठी **सावळी विहीर ता. राहाता जि.अहमदनगर** या ठिकाणी शाळा सुरु करण्यास तात्पुरती परवानगी देण्यात आलेली आहे. भविष्यात माध्यम व ठिकाण यामध्ये कोणताही बदल करता येणार नाही. संस्थेने अथवा शाळेने त्यात कोणताही बदल केल्यास सदर मान्यता आपोआप रदद होईल. तसेच या बदल दिनांकापासून सदर शाळा अनाधिकृत समजण्यात येईल.
25) सक्षम अधिका-याकडून सदर शाळेस युडायस क्रमांक प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची राहील.तथापि शाळेमध्ये प्रविष्ठ झालेल्या प्रत्येक विदयार्थ्यांची माहिती सरल प्रणालीमध्ये समाविष्ट करणे,अद्ययावत करणे,आधार लिंकिंग करणे,विहीत मुदतीत व नमुन्यात युडायस प्रपत्र संबंधित अधिका-याकडे सादर करणे, प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र अंतर्गत आवश्यक ती सर्व कार्यवाही करणे इ. बाबतची जबाबदारी शाळेची राहील.

(भास्कर पाटील)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद अहमदनगर.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय (विस्तार), दालन क्र.४४७,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२.
Email ID:- sm2.sesd-mh@gov.in

क्रमांकः-एसएफएस-१०२३/प्र.क्र.६८९/एसएम-२ (ई-ऑफीस क्र.११८७३८५) दिनांक १९ डिसेंबर, २०२५

**मान्यता पत्र**

प्रति,
अध्यक्ष / सचिव,
**ब्रदर्स ऑफ सेंट गॅब्रियल एज्युकेशन सोसायटी,**
**सैनिकवाडी, जि.पुणे- ४२३१०९.**

**विषय-** महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी मान्यता पत्र **ब्रदर्स ऑफ सेंट गॅब्रियल एज्युकेशन सोसायटी, सैनिकवाडी, जि.पुणे संचलित मॉन्टफोर्ट स्कूल, गट क्र.१९१/२/२, सावळीविहीर बुद्रुक, ता.राहता, जि.अहमदनगर.**

**संदर्भ-** इरादा पत्र क्रमांक एसएफएस-१०२३/प्र.क्र.६८९/एसएम-२, दि.०४/०९/२०२३.

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत **ब्रदर्स ऑफ सेंट गॅब्रियल एज्युकेशन सोसायटी, सैनिकवाडी, जि.पुणे संचलित मॉन्टफोर्ट स्कूल, गट क्र.१९१/२/२, सावळीविहीर बुद्रुक, ता.राहता, जि.अहमदनगर या प्राथमिक ते उच्च प्राथमिक शाळेला जोडून माध्यमिक (इ.९ वी ते इ.१० वी, इंग्रजी माध्यम, सी.बी.एस.ई.)** करीता स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर दर्जावाढ करण्यास परवानगी मिळणेसाठी अर्ज सादर केला होता.

२. आपल्या अर्जाच्या संदर्भात, महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ आणि महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) नियम, २०२० अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ पासून **ब्रदर्स ऑफ सेंट गॅब्रियल एज्युकेशन सोसायटी, सैनिकवाडी, जि.पुणे संचलित मॉन्टफोर्ट स्कूल, गट क्र.१९१/२/२, सावळीविहीर बुद्रुक, ता.राहता, जि.अहमदनगर या प्राथमिक ते उच्च प्राथमिक शाळेला जोडून माध्यमिक (इ.९ वी ते इ.१० वी, इंग्रजी माध्यम, सी.बी.एस.ई.)** करीता स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर दर्जावाढ करण्याकरीता, अटीं व शर्तीसह इरादा पत्र दिले होते. सदर शाळेस आता शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून पुढील अटीं व शर्तीस अधीन राहून दर्जावाढ करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३. अटी व शर्ती:-

१) प्रस्तावित शाळा, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ आणि महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ यांद्वारे निर्धारित केलेल्या सर्व मानकांची, अटींची व शर्तींची आणि या अधिनियमान्वये शासनाने दिलेल्या निदेशांची किंवा शासनाने, वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांची किंवा प्रमाणकांची किंवा अटींची आणि शर्तींची पूर्तता करील.

२) नोंदणीकृत संस्थेने किंवा न्यासाने किंवा कंपनीने, महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ याद्वारे निर्धारित केलेल्या सर्व मानकांचे, अटींचे व शर्तींचे आणि या अधिनियमान्वये शासनाने दिलेल्या निदेशांचे किंवा शासनाने, वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांचे किंवा अटींचे आणि शर्तींचे पालन करणे अनिवार्य आहे.

३) सी.बी.एस.ई. किंवा सी.आय.एस.सी.ई. किंवा सी.ए.आय.ई. किंवा आय.बी. इत्यादी मंडळाच्या संलग्नतेसाठी इच्छुक शाळा व्यवस्थापनांनी, शासनाने वेळोवेळी दिलेल्या निदेशांनुसार, शासनाकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेणे अनिवार्य आहे.

४) शाळा व्यवस्थापन, शासनाने मंजूर केलेल्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात करण्यापूर्वी संबंधित जिल्ह्याच्या शिक्षण अधिकाऱ्यास कळवील.

५) या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये नवीन शाळेची स्थापना करण्यासाठी किंवा शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी दिलेली परवानगी, ती ज्या शैक्षणिक वर्षासाठी मंजूर केली आहे, त्याच वर्षासाठी असेल.

६) जर शाळा व्यवस्थापन, १८ महिन्यांच्या आत, शाळा सुरु करण्यास अपयशी ठरल्यास, दिलेले मान्यता पत्र रद्द होईल.

७) शाळा व्यवस्थापनास, मंजूर केलेले शिक्षणाचे माध्यम, शाळेचे ठिकाण, भविष्यात, शासनाच्या परवानगीशिवाय बदलता येणार नाही.

८) जर शाळा व्यवस्थापनाने, शासनाने मंजुरी दिलेल्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा स्थापन केली असेल तर, त्या शाळेची परवानगी रद्द होईल.

९) अशी तरतूद करण्यात आली आहे की, स्वयंअर्थसहाय्यित शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती शासनाच्या प्रचलित नियमांनुसार व विनियमांनुसार करण्यात यावी.

१०) जिल्हानिहाय माहिती भरतेवेळी, ज्या शाळेस परवानगी देण्यात आली आहे, ती शाळा, स्वतंत्र प्रवर्ग म्हणून "स्वयंअर्थसहाय्यित शाळा" अशी माहिती भरतील व यु.डी.आय.एस.इ. क्रमांक मिळवितील. यासंबंधात, राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांस, नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे.

११) शाळा व्यवस्थापन, शाळा परिसराच्या प्रवेशद्वारावर "स्वयंअर्थसहायित परवानगीप्राप्त शाळा" असा फलक लावतील.

१२) या अधिनियमाच्या कोणत्याही किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींचा भंग केल्याच्या किंवा अधिनियमान्वये दिलेल्या कोणत्याही निदेशांचे किंवा शासनाने वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांचे किंवा प्रमाणकांचे अथवा अटी व शर्तींचे अनुपालन करण्यात कसूर केल्याच्या कारणावरुन, कोणत्याही वेळी, राज्य शासन, दिलेले मान्यता पत्र रद्द करु शकेल.

१३) शासन निर्णय दि.१३ मे २०२५ अन्वये शाळेतील विद्यार्थ्यांच्या सुरक्षा व सुरक्षिततेच्या अनुषंगाने करावयाच्या उपाययोजनांसंदर्भात दिलेल्या सर्वसमावेशक सूचनांची शाळेने काटेकोर अंमलबजावणी करणे अनिवार्य राहील.

१४) शासनाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा इतर कोणत्याही शर्ती.

PRAMOD VITHOBA KADAM

Digitally signed by PRAMOD VITHOBA KADAM
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SCHOOL EDUCATION AND SPORTS DEPARTMENT, 2.5.4.20=f82b9e0b005ed06987e1ae26683203c8f241022e0aad6b1c827af561b72f83bb, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=AF4901BED6A4BEE0ED963C63F1B0172A4718894A400C0988FB83381DB913696F, cn=PRAMOD VITHOBA KADAM
Date: 2025.12.19 13:30:39 +05'30'

(प्रमोद कदम)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत-

१. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
३. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे.
६. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जि.प.अहमदनगर.
७. निवडनस्ती (एसएम-२)(प्र.क्र.६८९/२०२३) (ई-ऑफीस क्र.११८७३८५).